## रे.दि.मु.क्र. २००/२०२१ मधील निशाणी क्र. २२ खालील आदेश

प्रतिवादी क्र. २ याने सदरचा अर्ज त्याला दाव्याची लेखी कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करून त्याचे विरुद्ध दिनांक ०७.०१.२०२२ रोजी झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल करून त्याची कैफियत व म्हणणे अभिलेखावर स्विकारण्यात यावी याकरिता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत प्रतिवादीने अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतो. त्याला कोर्ट कामाचे विशेष ज्ञान नाही. त्यास वकिलांची भेट घेवून कैफियत द्यायचे असते हे माहीत नाही व काही महत्त्वाची कागदपत्रे मिळालेली नाहीत. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादीस कैफियत तयार करण्याकरिता विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा जाणीवपूर्वक केलेला नाही. कायद्याने ९० दिवसाचे आत कैफियत देणे बंधनकारक आहे. परंतु प्रस्तुत प्रतिवादीस कायद्याचे ज्ञान नसलेने सदरचा विलंब झालेला आहे. दरम्यान दि. ०७.०१.२०२२ रोजी मे. न्यायालयाने प्रस्तुत प्रतिवादीविरुद्ध विनाकैफियत व विना म्हणणेचा आदेश केला आहे.

३) प्रस्तुत प्रतिवादीचे पुढे कथन असे की, कैफियत दाखल करून घेतलेस न्यायदानास मदत होणार आहे. मे. न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे वादी, प्रतिवादींचेत वाद संपुष्टात येणार आहे. उलट प्रस्तुत प्रतिवादीची कैफियत दाखल करून न घेतलेस त्याचेवर अन्याय होणार आहे. तरी याकामी झालेला विना कैफियत व विना म्हणणेचा हुकूम सेट असाईड होऊन मिळणे न्यायाचे होणार आहे व न्यायदानास मदत होणार आहे. सबब झालेला विलंब माफ करून प्रस्तुत प्रतिवादी विरुद्ध झालेला विना कैफियतचा व विना म्हणणेचा आदेश रद्दबातल करून त्याची कैफियत अभिलेखावर स्विकारण्यात यावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादी

मार्फत करण्यात आली आहे.

४) वादीतर्फे निशाणी क्र. २४ वर त्याचे म्हणणे दाखल करून अर्ज मंजुरीस विरोध दर्शविला आहे. वादीतर्फे असे म्हणणे दाखल करण्यात आले आहे की, प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व वस्तुस्थिती सोडून सोईनुसार वर्णन केलेला आहे. त्यामुळे सदर अर्जातील मजकूर वादीस मुळीच मान्य व कबूल नाही. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे. प्रस्तुत प्रतिवादीचे विलंब माफी अर्ज कलम १ मधील मजकूर खोटा व चुकीचा आहे. प्रस्तुत प्रतिवादीस दि. १८.०९.२०२१ रोजी मे. न्यायालयाचे समन्सची बजावणी झालेली असून प्रतिवादी हे त्याचे विधिज्ञ मार्फत दि. २२.१०.२०२१ रोजी मे. न्यायालयात वकीलपत्र हजर केले आहे. त्यानंतर त्याने कैफियत/म्हणणे मांडण्यास मुदती घेतलेल्या आहेत. असे असताना प्रतिवादीने सदर अर्जात प्रतिवादीस कोर्ट कामाचे विशेष ज्ञान नाही असे नमूद केलेले आहे. ते पूर्णतः चुकीचे व बेकायदेशीर आहे. प्रतिवादीस कायद्याचे ज्ञान नाही हा त्याचा बचाव होऊ शकत नाही. याही कारणाने प्रतिवादीचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब प्रस्तुत प्रतिवादीचा विलंबमाफीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा. यदाकदाचित मे. न्यायालय अर्ज मंजूर करणेच्या निर्णयास आल्यास प्रस्तुत प्रतिवादीस जाणीवपूर्वक विलंब केल्यामुळे त्यास दंड म्हणून रक्कम रू. १०००/– बसविण्यात यावा अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

५) अर्ज व म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

६) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळणेकरिता व डिक्लेरेशनकरिता दाखल करण्यात आलेला आहे. दावा उभय पक्षकारांच्या स्थावर मिळकतीतील हक्क व हितसंबंधाबाबतचा

आहे. प्रस्तुत प्रतिवादीने अर्जात नमूद केलेली कारणे विचारात घेण्यासारखी आहेत. तसेच उभय पक्षकारांमधील वाद विषयाचे स्वरूप विचारात घेतले असता वाद विषयाचे अंतिमतः गुणदोषावर निराकरण करण्यासाठी आणि नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारे प्रस्तुत प्रतिवादीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. तसे न केल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत निर्माण होवून प्रकरणांची अनेकता देखील होण्याची शक्यता आहे. सबब प्रस्तुत प्रतिवादीस त्याची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करण्याची संधी देणे जरुरीचे आहे असे माझे मत आहे. सबब प्रतिवादीने अर्जासोबत विलंबाने दाखल केलेली कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीस समन्सची बजावणी दि. १७.०९.२०२१ रोजी झाल्यानंतर व त्याचे विरुद्ध दिनांक ०७.०१.२०२२ रोजी विना कैफियतीचा आदेश झाल्यानंतर त्याच दिवशी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यास कैफियत दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाचा सारासार विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादीने वादीस खर्चाची रक्कम देण्याचे आदेशीत करणे जरुरीचे वाटते. प्रस्तुत प्रकरणात झालेल्या विलंबाचा सारासार विचार केला असता प्रस्तुत प्रतिवादीने वादीस खर्चापोटी एकूण रक्कम रू. २००/– देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. वरील सर्व कारणांचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादीने वादीस खर्चाची एकूण रक्कम रू. २००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने वादीस वर आदेशीत केल्याप्रमाणे खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्याचे विरुद्ध दिनांक ०७.०१.२०२२ रोजी झालेला विना कैफियतीचा आदेश

रद्दबातल करून त्यास लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून त्याने या अर्जासोबत दाखल केलेली कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावी.

३. अनुषंगिक आदेश निशाणी क्र. १ खाली पारित करण्यात यावा.

स्वाक्षरीत/-

स्थळः- जत
दि. २०.०१.२०२२

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHSN2400)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार (लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. एकनाथ को. चौगले.<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | २०/०१/२०२२. |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | २०/०१/२०२२. |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०१/०२/२०२२. |